**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

परिपत्रक क्रमांक :- पीईएन २१०६/(३३२/०६)/माशि-६,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,

**दिनांक :-** २० एप्रिल, २००७.

**वाचावे :-**
१) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग,
क्रमांक- एसएसएन ३३६५/जी, दि. ४/११/१९६८.
२) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग,
क्रमांक- एसएसएन ११६९/जी, दि. २७/१२/१९६९.
३) शासन निर्णय, शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभाग,
क्रमांक- एसएसएन १९६८/जी, दि. १५/१०/१९७१.
४) शासन निर्णय, शिक्षण विभाग, क्रमांक- एसएसएन ९९८०/जी,
दि. ३०/८/१९७२.
५) शासन निर्णय, शिक्षण विभाग, क्रमांक- एसएसएन ९९८०/जी,
दि. ३१/८/१९७२.
६) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग,क्रमांक :-
पीईएन १०८८/१२०१७३/(५८२)/माशि-६, दि. १०/५/१९८९.

**प्रस्तावना :**

अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता निवृत्तीवेतन योजना उपरोक्त शासन निर्णय अनुक्रमे दि. ४/११/१९६८ व ३०/८/१९७२ अन्वये लागू करण्यात आली. सदरहू शासन निर्णयातील परिच्छेद ७ नुसार संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवेतील सेवाखंड क्षमापित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या अधिकारामध्ये क्षमापित न होऊ शकणाऱ्या सेवाखंडासंबंधिचे अधिकार शासन निर्णय दि. १२/११/१९७६ नुसार शासन स्तरावर सचिव, शालेय शिक्षण यांना प्रदान करण्यात आले आहेत. सदरहू सर्व आदेश विचारात घेऊन उपरोक्त परिपत्रक दि. १०/५/१९८९ अन्वये एकत्रित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक व शासन स्तरावरील अधिकाराबाबतच्या अटी स्वतंत्रपणे दिलेल्या असतांना काही प्रकरणी दोन्ही अटींची सांगड घालून क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या स्तरावर सेवाखंडाची प्रकरणे नाकारण्यात आल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी त्यांच्या अधिकारात निर्णय घेतांना शासन स्तरावरील दि. १२/११/१९७६ च्या निर्णयानुसार असणाऱ्या अधिकाराशी सांगड घालू नये अशा सूचनादेखील दि. १०/५/१९८९ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे वेळोवेळी सविस्तर सूचना देऊन देखील अद्यापही क्षेत्रिय स्तरावरुन संबंधित सूचनांप्रमाणे तपासणी न करता वेळोवेळी शासनाकडे अपूर्ण प्रस्ताव केला जातो. तसेच सदरहू प्रस्तावामध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक अथवा शासन स्तरावरील कोणत्या अटींची पूर्तता होते अथवा नाही याबाबत देखील अभिप्राय दिलेले नसतात. त्यामुळे सेवाखंडासंबंधात शासन स्तरावर मोठ्या प्रमाणावर त्रोटक/अपूर्ण प्रस्ताव प्राप्त होतात आणि सदर प्रस्तावासंबंधात पूरक माहिती घेण्यामध्ये शासनाचा वेळ व पैसा अनावश्यक खर्च होतो. त्याशिवाय प्रस्तावावर निर्णय होण्याकरिता देखील विलंब होतो.

शासनास सादर झालेल्या या विभागाच्या अधिकारात न बसणाऱ्या सेवाखंडाचे प्रस्ताव या विभागामार्फत वित्त विभागास मान्यतेस्तव सादर केले जातात. अशा प्रस्तावाच्या अनुषंगाने "ज्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवृत्ती पूर्वीच्या सलग सेवेच्या आधारे निवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरले आहे अशा कर्मचाऱ्यांना केवळ वाढीव निवृत्ती वेतनाचा लाभ मिळावा याकरिता त्यांच्या सेवेतील खंड क्षमापित करण्याचे प्रस्ताव पाठवू नयेत" असे स्पष्ट अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत.

उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेली वस्तुस्थिती व वित्त विभागाचे अभिप्राय पाहता सेवाखंडाच्या प्रस्तावाबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

<u>परिपत्रक :-</u>

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवेतील सेवाखंड क्षमापित करण्याचे प्रस्ताव तातडीने निकाली निघण्याच्या दृष्टीने संबंधित शाळेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी परिपूर्णरित्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक यांच्या स्तरावरुन होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करावी :-

(१) उपरोक्त शासन परिपत्रक दि. १०/५/१९८९ मधील परिच्छेद १ मधील अटींची पूर्तता होत असल्यास तशा शिफारशीसह प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे सादर करावेत.

(२) उपरोक्त शासन परिपत्रक दि. १०/५/१९८९ मधील परिच्छेद १ मधील अटींची पूर्तता होत नसल्यास मात्र उपरोक्त परिपत्रकातील परिच्छेद ३ मधील अटींची पूर्तता होत असल्यास तशा अभिप्रायासह प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालकांमार्फत शासनास सादर करावेत.

(३) उपरोक्त शासन परिपत्रक दि. १०/५/१९८९ परिच्छेद १ व ३ या दोन्ही मधील अटींची पूर्तता होत नसल्यास त्याप्रमाणे " शासन परिपत्रक दि. १०/५/१९८९ मधील अटींची पूर्तता होत नसल्यामुळे आपला सेवाखंड क्षमापित करता येत नसल्याचे " शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक यांच्या स्तरावरुन संबंधितांस कळविण्यात यावे.

(४) निवृत्तीपूर्व शेवटच्या सलग अर्हताकारी सेवेवर निवृत्तीवेतन अनुज्ञेय होत असल्यास केवळ वाढीव दराने निवृत्तीवेतन मिळावे याकरिता नियमांचे शिथिलीकरण करण्याचे शासनाचे धोरण नाही. त्यामुळे अशाप्रकरणी "विशेष बाब" म्हणून सेवाखंड क्षमापित करण्याचा विचार शासन स्तरावरुन केला जात नाही. सबब, प्रदीर्घकाळ सेवा करुनही केवळ सेवेतील खंडामुळे एखाद्या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरत नसेल अशा अपवादात्मक प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालकांमार्फत शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक यांनी उचित प्रस्ताव विचारार्थ शासनास सादर करावा. सदरहू प्रस्ताव सोबतच्या परिशिष्ट-एक नुसार दिलेल्या तपासणी सूचीप्रमाणे तपासून सादर करावा.

वरील सूचनांची अंमलबजावणी सर्व स्तरावर काटेकोरपणे होणे आवश्यक असल्यामुळे सदर सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात. तसेच, प्रचलित सूचना/आदेशानुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही न करता केवळ मार्गदर्शनार्थ / उचित आदेशार्थ प्रस्ताव शासनास सादर करु नयेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक 20070420125834001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. स. वनगर)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
३) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा,
४) शिक्षण निरीक्षक (उत्तर, पश्चिम व दक्षिण), मुंबई.
५) निवड नस्ती, माशि-६.

## परिशिष्ट - एक

**शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांचे सेवाखंड क्षमापित करण्याच्या प्रस्तावाबाबत तपासणी सूची.**

**अ) सादर करावयाची माहिती :-** १. कर्मचा-याचे पूर्ण नाव व पदनाम.

२. कर्मचाऱ्याची जन्मतारीख.

३. प्रथम नियुक्तीचा दिनांक

४. सेवानिवृत्तीचा दिनांक

५. प्रशिक्षित झाल्याबाबत माहिती

अ) डी.एड. / बी.एड.

ब) प्रशिक्षण पुर्ण केल्याचा दिनांक

६. सेवाविषयक व सेवाखंडाचा तपशील :-

| क्रमांक | शाळेचे नाव | अनुदानीत /विना अनुदानीत | सेवा कालावधी (पासून-पर्यंत) (वर्ष:महिने:दिवस) | सेवाखंड कालावधी | सेवाखंडाचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | दि. / / ते दि. / / ( : : ) | दि. / / ते दि / / ( : : ) | |
| २ | | | दि. / / ते दि / / ( : : ) | दि. / / ते दि / / ( : : ) | |
| | एकुण कालावधी | | ( : : ) | ( : : ) | |

टिप :- प्रत्येक सेवाखंडाच्या अनुषंगाने सेवाखंडाचे कारण व त्यास संबंधित शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी स्वत: जबाबदार आहे किंवा कसे, तसेच राजीनाम्यामुळे सेवाखंड झालेला असल्यास, राजीनामा कोणत्या कारणास्तव दिला, याचा स्पष्ट उल्लेख करावा.

**ब) जोडावयाची कागदपत्रे :-** १. सेवा कालावधीची विहित नमुन्यातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी साक्षांकित केलेली सेवाप्रमाणपत्रे.(सेवा प्रमाणपत्रावर सदर शाळा चालविणा-या संस्थेच्या/ व्यवस्थापनाच्या नावाची मोहोर किंवा नाव, पत्ता असावा. तसेच, एकाच संस्थेच्या अधिपत्याखालील विविध शाळांमध्ये बदलीने नियुक्ती केलेली असल्यास, त्याच्या सेवा प्रमाणपत्रामध्ये तसा स्पष्ट उल्लेख असावा.)

२. सेवाखंड कालावधीत इतरत्र सेवा केली आहे किंवा कसे. याबाबत संबंधित कर्मचा-याने प्रतिज्ञापत्र सादर करावे.

३. संबंधित कर्मचा-याच्या सेवापुस्तकाचे प्रथम पृष्ठ आणि सेवातपशिल व खंडाबाबत नोंदी असणा-या पृष्ठांच्या संबंधित प्रती प्रस्तावासोबत जोडाव्यात. सदरहू प्रती ज्या अधिका-याच्या अधिनस्त सेवापुस्तक असेल त्या अधिका-याने साक्षांकित कराव्यात.

४. प्रस्तावातील आवश्यक त्या नोंदी मूळ सेवापुस्तकावरुन करण्यात आल्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रमाणपत्र.

**टिप :-** पत्रव्यवहारामध्ये मूळ सेवापुस्तक गहाळ होण्याची शक्यता गृहीत धरता शासनास प्रस्ताव सादर करताना शासनाकडून वेगळयाने मागणी आल्याशिवाय मूळ पुस्तक सादर करण्याची आवश्यकता नाही.त्याऐवजी प्रस्तावाची छाननी शिक्षणाधिकारी यांच्यास्तरावर करतानाच मूळ सेवापुस्तकावरुन आवश्यकती खातरजमा करावी. आणि तसे प्रमाणित करावे.